जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२५ दिनांक : -८ फेब्रुवारी २०२५

जळगाव, ८ फेब्रुवारी २०२५ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे आयोजित आंतरराष्ट्रीय गणित आणि सांख्यिकी परिषद (ICRTMS-2025) मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या दोन दिवसीय परिषदेत भारतासह विविध देशांतील तज्ज्ञ, संशोधक आणि अभ्यासकांनी सहभाग घेतला.

या परिषदेच्या समारोप शनिवार दि.८ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. या समारोप समारंभास मंचावर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. पी. वीरमणी (IIT मद्रास), प्रा. ओमप्रकाश (आय आय टी पटणा), प्रा. डी. डी. पवार (नांदेड विद्यापीठ), प्रा. एस. आर. देशमुख (पुणे विद्यापीठ), आणि प्रा. तिर्थंकर घोष (विस्वभारती केंद्रीय विद्यापीठ, शांतिनिकेतन) प्रशाळेचे संचालक प्रा. किशोर पवार, संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा.किर्ती कमळजा व गणितशास्त्र विभागप्रमुख प्रा.एच.एल. तिडके हे उपस्थित होते.

प्रा.वीरमणी यांनी त्यांच्या भाषणात संशोधनाच्या प्रगतीसाठी अशा आंतरराष्ट्रीय परिषदा अत्यंत उपयुक्त असल्याचे अधोरेखित केले. या परिषदेत अमेरिका, तुर्की, इटली, श्रीलंका, इंडोनेशिया आणि भारत भरातील संशोधकांनी सहभाग घेतल्याबद्दल विशेष आनंद व्यक्त केला. या परिषदेत गणितरत्न पुरस्कार प्रा. अपूर्व खरे (IISc बेंगळुरू) यांना प्रा. ठाकरें गौरव संस्था, पुणे तर्फे दिला गेला ही उल्लेखनीय बाबत असल्याचे त्यांनी सांगितले. व्यासपीठावरील इतर मान्यवरांनी त्यांच्या भाषणात परिषदेत सादर झालेल्या विविध संशोधन विषयांची प्रशंसा करत, संशोधन आणि अध्यापनाच्या दृष्टीने ही परिषद अत्यंत फलदायी ठरल्याचे नमूद केले. परिषदेच्या उद्घाटन आणि विविध सत्रांमध्ये IISc बेंगळुरू, IITs, केंद्रीय विद्यापीठे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमधील निमंत्रित मान्यवर वक्ते यांनी आपल्या व्याख्यानांद्वारे संशोधनाच्या ताज्या प्रवृत्तींचे विवेचन केले. तसेच संशोधक आणि विद्यार्थी यांना आपले सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

प्रास्ताविक करतांना प्रो. किशोर पवार, अध्यक्ष ICRTMS-2025 आणि संचालक, स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस यांनी या आंतर राष्ट्रीय परिषदेत २८० हून अधिक नोंदणीकृत सहभागी आणि १८० पेक्षा जास्त संशोधन पेपर सादर करण्यात आले. या परिषदेत सहभागी संशोधक, शिक्षक आणि निमंत्रित वक्त्यांनी दिलेल्या अत्यंत सकारात्मक अभिप्रायाने या परिषदेचे महत्त्व अधिक वृद्धिंगत झाले अशी माहिती दिली. त्यांनी परिषदेचे संपूर्ण आढावा सादर करत सर्वांच्या योगदानाची प्रशंसा केली व संपूर्ण आयोजनात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी प्र कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे विद्यापीठ प्रशासन यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. विविध समित्यांनी सुयोग्य नियोजन करत प्रवास, निवास, भोजन, नोंदणी, रंगोळी आणि

तांत्रिक सुविधा यांची जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली. विद्यापीठाच्या कर्मचारी आणि संशोधक विद्यार्थ्यांनीही आपल्या जबाबदाऱ्या उत्कृष्टरीत्या पार पाडल्या.

ही परिषद भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून PM-USHA अंतर्गत योजना आणि UpThink Edutech Pvt. Ltd. यांच्या आर्थिक सहकार्याने आयोजित करण्यात आली.

.........................................................................................................

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता